# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
गडचिरोली दि. १७/१०/२०१७

आज दिनांक १५/१०/२०१७ रोजी उप पोलीस स्टेशन दामरंचा च्या वतीने मा पोलीस स्टेशन दामरंचा च्या वतीने मा. पोलीस अधिक्षक श्री. डॉ. अभिनव देशमुख सा यांच्या मार्गदर्शनाखाली, मा अपर पोलीस अधिक्षक राजा सा. यांच्या नियंत्रणाखाली व मा. उपविभागरय पोलीस अधिकारी डॉ. संतोष गायकवाड सा. यांच्या अध्यक्षतेखाली भव्य जनजागरण मेळावा व आदिवासी सामुयिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला.

या विवाह सोहळयामध्ये उप पोलीस स्टेशन दामरंचा हद्दीमधील येणारी २६ गावे व त्यामधील २०२ जोडपी विवाह बध्द झाली या समुदायिक विवाह सोहळयामध्ये नाव नोंदणी केलेल्या सर्व जोडप्यांचे लग्न यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले. २०२ जोडप्यांची मिरवणूक उपपोस्टे दामरंचा येथून चौकापर्यंत नेऊन परत पोस्टे पर्यंत वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये अनिल मनोहर लवटे प्रभारी अधिकारी उप पोलीस स्टेशन दामरंचा पोउपनि अभिजीत भेसले सा. गणेश मोरे सा अप्पासाहेब पडळकर सा. व्यंकट गंगलवार सा. कर्मचारी वृंद तसेच महाराष्ट्र पोलीस मित्र परीवार पुणे NNS टिम, आठवण ग्रृप अविष्कार अकॅडमी व काही दानशुर व्यक्तिंनी महत्वाची भुमिका निभावली. या मिरवणुकीत मोठया संख्येने लोकांनी नृत्य करुन आनंद व्यक्त केला. तसेच आशा, वेलगुर, भंगारामपेठा या गावातील लोकांनी आदिवासी नृत्य सादर करुन जमलेल्या लोकांचे मनोरंजन केले. सामुदायिक विवाह सोहळयाचा शेवट आदिवासी लोकांच्या परंपरेप्रमाणे नॉनवेज (मांसाहारी) जेवणाची मेजवानी देवून करण्यात आला.













